Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 704 – 707
DOI: 10.5281/zenodo.10279313

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे महिलांविषयक विचार

सौ. प्रतिमा कमलाकर बोरोळकर

संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र संशोधन केंद्र, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधी यांचे नाव मोहनदास करमचंद गांधी हे होते. ज्यांना आज लोक महात्मा गांधी म्हणून ओळखतात. गांधीजी हे एक प्रमुख राजकीय नेते व सामाजिक सुधारक होते. ज्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1969 रोजी पोरबंदर या सध्याच्या गुजरात येथील लहान शहरात झाला. गांधीजी हे व्यवसायाने वकील होते. गांधीजींच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील सहभाग. ते दुसऱ्या महायुद्धाचे कट्टर विरोधक होते. विविध संस्कृती आणि राष्ट्रामध्ये शांतता आणि समजुतदारपणा वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

महात्मा गांधी हे दूरदर्शी नेते होते. ज्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांचा असा विश्वास होता की, शिक्षण हे व्यक्ती आणि समुदायांना सक्षम बनविण्यासाठी आणि त्यांची पूर्ण क्षमता साध्य करण्यासाठी मदत करते. शिक्षण सर्वांगीण असले पाहिजे आणि व्यक्तीने चारित्र्य आणि नैतिक मूल्ये विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. गांधीजी हे एक आध्यात्मिक नेते होते. ज्यांना ध्यान आणि आत्म-चिंतनाच्या सामर्थ्यावर विश्वास होता. त्यांचा असा विश्वास होता की, सामाजिक आणि राजकीय बदलासाठी वैयक्तिक परिवर्तन आवश्यक आहे. त्यांनी लोकांना साधे आणि नि:स्वार्थ जीवन जगण्यास प्रोत्साहित केले. साधी राहणी व उच्च विचारसरणी या तत्त्वावर त्यांनी विश्वास ठेवला. लोकांना निसर्गाशी सुसंगत राहण्यास आणि पर्यावरणाचा आदर करण्यास प्रोत्साहित केले. गांधीजींचा असा विश्वास होता की, सर्व धर्मामध्ये प्रेम, करुणा आणि सहिष्णूतेची समान तत्त्वे आहेत. आणि ते एक चांगले जग निर्माण करण्यासाठी एकत्र काम करू शकतात. त्यांनी आंतरधर्मीय संवादाची वकिली केली. त्यांच्या मते, विविध धर्मांच्या लोकांनी एकमेकांकडून शिकण्यासाठी आणि समान ध्येयासाठी एकत्र आले पाहिजे. गांधीजींच्या धार्मिक सौहार्दाची बांधिलकी

आणि एकता आणि सहकार्याच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे जगभरातील अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक नेत्यांवर त्यांचा प्रभाव पडला होता.

गांधीजी लेखक आणि वक्ते सुद्धा होते. त्यांनी राजकारण, धर्म आणि सामाजिक समस्यांसह विविध विषयांवर विपुल लेखन केले. त्यांचे लेखन आणि भाषणे आजही अभ्यासली जात आहेत. शब्दांमध्ये वाईटाचे चांगल्यामध्ये रुपांतर करण्याची शक्ती असते. असा विश्वास बाळगणाऱ्या गांधीजींनी जगाला अहिंसेची शिकवण दिली. जे काम कोणत्याही शस्त्राने करता येत नाही ते काम कायदा आणि नैतिकतेने होऊ शकते असे ते नेहमी सांगत असत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महात्मा गांधीजींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यामुळेच त्यांना 'राष्ट्रपिता' म्हणून सर्वत्र ओळखले जाते. त्यांचा जन्मदिवस भारताव्यतिरिक्त जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांना अहिंसावादी स्वातंत्र्यसैनिक म्हटले जाते. गांधीजींनी लंडनमधील इतर ठिकाणी कायद्याचे शिक्षण घेतले. भारतात वकिलीचा सराव करण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर ते 1893 मध्ये दक्षिण आफ्रिकेत गेले. तेथे ते 21 वर्षे राहिले. दक्षिण आफ्रिकेतच गांधीजींनी प्रथम नागरी हक्कासाठी अहिंसक प्रतिकाराची युक्ती वापरली. या सक्रियतेमुळे गांधीजींना 'महात्मा' म्हणजे महान आत्मा ही पदवी मिळाली. 1915 मध्ये गांधी भारतात परतले तेव्हा त्यांनी भारतातील शेतमजूर, शेतकरी, कामगार आणि महिलांचे नेतृत्व केले. त्यांनी सत्याग्रहाची देण संपूर्ण जगाला दिली. सत्याग्रह हा शब्द संस्कृत आणि हिंदी आहे. ज्याचा अर्थ सत्याला धरून राहणे असा होतो. गांधीजी 1919 मध्ये भारतीय राजकारणात सामील झाले.

महिला सक्षमीकणामध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. स्त्रियांनी मानसिक आणि शारीरिकरित्या खंबीर होण्याची गरज आहे असे महात्मा गांधीजींनी सांगितले होते. महिला सक्षमीसाठी त्यांनी खूप प्रयत्नही केले. महात्मा गांधीजींना संपूर्ण समाजाचे उत्थान करायचे होते. भारताचा विकास होण्याकरिता खेड्यांचा विकास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणूनच त्यांनी स्वच्छता मोहिमेसह 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला. ग्रामीण स्तावर येऊन लोकांसाठी कार्य करताना सामान्य लोकांमध्ये मिसळून जनजागृती करताना त्यांना महिलांचे खडतर आयुष्य दिसले.

केवळ चूल आणि मूल, पती परमेश्वर, घर-संसार यामध्ये या महिला गुंतून पडल्या होत्या. आपण अबला आहोत, आपल्याकडून कोणतेही कार्य होणार नाही असा गैरसमज त्यांनी करून घेतला होता. मुख्यत: त्यांच्यावर असणारी सामाजिक बंधने, पुरुषप्रधान संस्कृती यामुळे त्यांचे अधिकाधिक खच्चीकरण झाले. त्यातही हिंदू स्त्रिया आणि मुस्लिम स्त्रिया यांच्याही स्वातंत्र्यामध्ये फरक होता. स्त्री म्हणून असणारी बंधने आणि धार्मिक बंधने यामुळे स्त्रियांचे आयुष्य खडतर झाले होते. जनजागृती करताना अनेक सभांमधून महात्मा गांधीजींनी स्त्रियांना सक्षम होण्याचा सल्ला दिला. त्यांनी मुख्य मुद्दा असा मांडला की, स्त्री ही अबला नसते. हिंदू धर्मातील अनेक स्त्रियांची उदाहरणे त्यांनी दिली. या स्त्रियांनी वनवास सहन केला, संकटामध्ये स्थिर राहिल्या, आपल्या पतीचे प्राण जिद्दीने परत आणले. महात्मा गांधीनी महिलांना हिंदू धर्मातील कर्तृत्व सिद्ध केलेल्या स्त्रियांचा आदर्श घेण्यास सांगितले. केवळ मानसिकदृष्ट्या सक्षम न होता

शारीरिक आणि आर्थिकदृष्ट्याही सक्षम होणे आवश्यक आहे. महिलांनी केवळ घरची कामे न करता पतीसेवा आणि मुलांमध्ये गुंतून न पडता स्वत:साठीही वेळ द्यावा. ग्रामीण स्तरावर जनसेवा करणे, सुत कातणे अशी कामे काही तास करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

**महिलांना सक्षम करणारे गांधीजींचे विचार**

महात्मा गांधीजींचे स्त्रियांबद्दलचे विचार बहुतेक त्यांच्या 'माय एक्सपिरिमेंटस विथ ट्रूथ' या आत्मचरित्राच्या रुपात दिसले. पुरुषाने स्त्रीवर जे अन्याय केले आहेत ते बघून मी क्षुब्ध होतो. स्त्री आणि पुरुष एकच आहेत. त्यांनी त्यांचे प्रश्न वेगवेगळे असता कामा नये. तेही एकच असले पाहिजेत. हा स्त्री-पुरुष समतेकडे नेणारा मार्ग ते सांगतात. दक्षिण आफ्रिकेतील लढ्यात स्त्रियांच्या निर्भय सहभागाचा मोठा प्रभाव गांधीजींवर पडला. आजही पुरुषांच्या मानसिकतेत फारसा बदल झालेला नाही हे सत्य आहे. पितृसत्ताक मानसिकतेने स्त्रियांना उपभोगाची वस्तू आणि गुलाम मानले आहे. गांधीजींनी स्पष्टपणे सांगितले होते की, मी स्त्री असतो तर पुरुषांकडून होणारे अत्याचार त्यांनी सहन केले नसते.

बापूंनी सीता आणि द्रोपदी यांना आदर्श स्त्रिया मानले. त्या धार्मिक पात्र होत्या म्हणू नव्हे तर त्या दोघीही धैर्यवान होत्या आणि प्रतिकार कसा करायचा हेही त्यांना माहिती होते. धर्म आणि परंपरावर श्रद्धा असलेल्या महात्मा गांधीनी याकडे कधीच बेड्यासारखे पाहिले नाही. परंपरांच्या नशेत पोहणे चांगली गोष्ट आहे पण त्यात बुडणे म्हणजे आत्महत्येसारखे आहे असे त्यांचे मत होते. अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा त्यांना त्यांच्या आई आणि पत्नीकडून मिळाली. महात्मा गांधीनी मान्य केले आहे. पत्नी कस्तूरबा त्या काळातील पारंपरिक पत्नीपेक्षा वेगळया होत्या. त्यांनाही पुरुषांची गुलामी आवडत नसे. म्हणूनच त्यांनी मोहन मोहनदासला दबंग पतीपासून समजूतदार पती बनवण्यास मदत केली. दांडीयात्रा आणि आणि सत्याग्रह हे केवळ महिला कार्यकर्त्यांमुळेच यशस्वी झाले अशी त्यांची धारणा होती.

गांधीजींनी महिलांकडे केवळ सक्षमीकरणाचा विषय म्हणून पाहिला नाही उलट त्यांचा असा विश्वास होता की त्या केवळ स्वत:च्याच नव्हे तर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. महिलांना मुक्त व्हायचे असेल तर त्यांना निर्भय बनावे लागेल. कुटुंब आणि समाजाची बंधने तोडून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध आंदोलन केल्यानेच त्यांना यातून मुक्तता मिळू शकते. तत्कालीन नेते आणि पक्षाप्रमाणे गांधीजींची स्त्रियांना कोणत्याही बाबतीत पुरुषापेक्षा कमी मानत नव्हते. उलट त्यांचा विश्वास होता की स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक दयाळू आणि बलवान आहेत. स्त्रियांना कमकुवत म्हणणे त्यांना अजिबात आवडत नव्हते. तो स्त्रियांच्या आंतरिक शक्तीचा अपमान मानत असत. त्यांना आपण कमकुवत म्हणतो मात्र त्या बलवान झाल्या तर प्रत्येक असहाय्य व्यक्ती सामर्थ्यवान होईल असे त्यांनी अनेक वेळा सांगितले. गांधीजींनी काँग्रेसमधील महिला नेतृत्वाला प्रोत्साहन दिले आणि प्रत्येक चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित केला. 2 मे 1936 च्या 'हरिजन' या वृत्तपत्रामध्येही गांधीजींनी देशाच्या शिक्षणावर आपले मत

मांडताना स्पष्टपणे सांगितले होते की, स्त्रीने इतके बलवान बनले पाहिजे की, तिने आपल्या पतीलाही नाही म्हणण्यास मागेपुढे पाहू नये. महिलांनी त्यांचे हक्क आणि कर्तव्य जाणून घेतले पाहिजे.

महिलांना सक्षम बनवायचे असेल तर कुटुंबातूनच पुढाकार घ्यावा लागेल. असे गांधीजींनी सांगितले. महिला जोपर्यंत चुकीच्या गोष्टी सहन करते तोपर्यंत तिच्यावर अत्याचार होतच राहतील. जय दिवशी स्त्री रात्री रस्त्यावर मोकळेपणाने फिरू लागेल तेव्हा आपण म्हणू शकतो की, खऱ्या अर्थाने भारताला स्वातंत्र्य मिळाले आहे. मंद गतीने मिळाला तरी चांगल्याचा विजय होतो यावर त्यांचा विश्वास होता. जीवन जगण्यातला आणि सृष्टीने घडणाऱ्या गोष्टींमागे असणाऱ्या प्रयोजनातला आनंद त्यांना गवसला होता. जगाशी वाटून घेण्याजोगी काही महान सत्य त्यांना जन्मतःच प्रदान केली गेली आहेत असे गांधीजींना वाटत होते. त्यातली काही प्रत्यक्षात उतरलेली त्यांनी पाहिली होती. समोर येणारा प्रत्येक दिवस कोणती न कोणती इच्छा पूर्ण करूनच मावळत असे. आपल्या पन्नास वर्षाच्या सार्वजनिक जीवनात गांधीनी 'इंडियन ओपिनियन', 'यंग इंडिया', 'नवजीवन', 'हरीजन' या नियतकालिकांचे संपादन केले व यामध्येही स्त्रीविषयक विपुल लेखन केलेले दिसून येते.

**समारोप**

आजपर्यंत महिलांचे नेतृत्व करणाऱ्या पुरुषांचे नेतृत्व भारतीय महिलांनी करावे असे म.गांधीजींचे स्वप्न होते. एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती शिक्षित होतो पण एक स्त्री शिकली तर पूर्ण परिवार शिक्षित होतो. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या मुक्तीवर विश्वास ठेवला. त्यांनी भारतीय समाजाच्या कायाकल्पात, राजकीय, सामाजिक विकासासासंबंधी हालचालीमध्ये महिलांविषयी कोणताही भेदभाव ठेवला नाही.

**संदर्भ सूची**

१. सुहास कुलकर्णी, मिलिंद नेरकर, 'यांनी घडवलं सहस्त्रक', रोहन प्रकाशन, 2 ऑक्टोबर 2003
२. मोहनदास करमचंद गांधी, राजमोहन गांधी, अनु.मुक्ता शिरीष देशपांडे, मेहता पब्लिशिंग हाऊस, 4 नोव्हेंबर 2013
३. अमर उजाला-गांधी व सक्षमीकरण